नि.फौ.ख.क्र. १४३६/२०२१ नि.क्र. ३५

## फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे आरोपीचे निवेदन

आरोपी क्र १ चे नावः साबीर इस्माईल खान

वय : ४३ वर्षे

राहणार : जे. जे. गलली, मक्काक मस्जीद शेजारी,
घर नं. १२०१ घासगल्ली, कोठला, अहमदनगर.

[टिपः– संबंधित प्रश्न तयार करणेकामी प्रस्तुत न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३(५) नुसार अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती सीमा शेख आणि आरोपीतर्फे वकील श्री. एस. एम. गवळी यांचे सहाय्य घेतले असून, माननीय सर्वोच्च न्यायालयाचे राज कुमार वि. सरकार 2023 SCC OnLine SC 609 मधील न्यायनिर्देशांची पूर्तता केलेली आहे.]

प्र.क्र. १ तुमच्या विरुध्द आलेल्या पुराव्याबाबत आपणास खालील प्रश्न विचारण्यात येत असून त्याची उत्तरे देणे तुम्हास बंधनकारक नाही आणि प्रश्नाची उत्तरे न दिल्यास तुमच्यावर कोणतीही कारवाई होणार नाही. परंतु प्रश्नाच्या उत्तरात आपल्या विरूध्द एखादी बाब आढळून आल्यास ती बाब पुरावा म्हणून ग्राहय धरण्यात येईल. सदरची बाब तुम्हास समजली काय?

उत्तर. होय.

प्र.क्र. २ अभियोग पक्षातर्फे नोंदविण्यात आलेल्या साक्षीदारांची साक्ष आपणास समजली काय?

उत्तर. होय.

प्र.क्र. ३ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ इशरत नब्बु खान यांच्या साक्षीत असे आले आहे की, त्यांचे घरामध्ये आई वडिल, भाऊ व त्यांची पत्नी आहे व तुम्ही त्यांचे शेजारी राहता, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे

प्र.क्र. ४ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, ते भाडेकरु म्हणुन मीर फिरोज यांचे घरात राहतात, ते भाडेकरु असल्याने तुम्ही त्यांना त्रास देत होते, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ५ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, दि. १३/०८/२०२१ रोजी तुम्ही त्यांचा हात पकडला आणि म्हणाले की, माझ्याशी लग्न कर, त्यांनी तुम्हाला नकार दिला असता तुम्ही त्यांचे आई वडिलांना जिवे मारण्याची धमकी दिली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ६ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यामुळे त्यांनी पोलीस स्टेशनला जाऊन तक्रार दिली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ७ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, दि. १०/१०/२०२१ रोजी दुपारी ३.०० वा. त्या सृष्टी ब्युटी पार्लरमध्ये काम करत होत्या त्यावेळी त्यांचे आईने फोन करुन त्यांना कळविले की, तुम्ही बांबु व जाळी लावुन त्यांचे घरी जाण्याचा रस्ता बंद केला आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ८ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, दहा मिनीटात त्या घरी पोहोचल्या तुम्हाला त्यांनी रस्ता का बंद केला असे विचारले असता तुमचा भाऊ बब्बु इस्माईल याने त्यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली व आईवरुन शिवीगाळ केली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ९ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तुम्ही त्यांची गचांडी पकडली, बुरखा पकडल्यामुळे बुरखा फाटला व गळ्यातील सोन्याची चैन तुटली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. १० अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी घरमालकास फोन केला, घरमालक व त्यांची मुलगी आल्यानंतर त्यांनी तुम्हाला समजावण्याचा प्रयत्न केला असता तुम्ही त्यांना शिवीगाळ केली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ११ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तुम्ही बुरखा फाडल्याने त्यांना लज्जा उत्पन्न झाली म्हणुन त्यांनी पोलीस स्टेशनला फिर्याद (नि.१३) दिली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. १२ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यांनी पोलिसांना घटनास्थळ दाखविले, पंचनाम्यातील घटनास्थळाचा नकाशा बरोबर आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. १३ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, न्यायालयात त्यांचा जबाब (नि.१४) नोंदविला होता, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. १४ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की,

न्यायालयात त्यांनी घटनेच्या वेळी अंगावर घातलेला जप्त केलेला बुरखा वस्तु क्र. अ ओळखला आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. १५ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ मीर फिरोजा इकबाल यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, ते घटनेच्या वेळेस घासगल्ली, कोठला येथे राहत होते, व ते तुम्हाला शेजारी असल्याने ओळखतात, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. १६ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, सदरचे घर घटनेच्या अगोदर शाकीर मुस्ताफा खान यांना भाडयाने दिले होते, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. १७ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तुमचे आणि त्यांचे घराच्या जागेवरुन पूर्वीपासुन वाद होते, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. १८ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, दि. १०/१०/२०२१ रोजी दुपारी ३.०० वा. चे सुमारास शाकीर मुस्ताफा खान यांच्या मुलीचा त्यांना फोन आला, घराकडे येणारा रस्ता तुम्ही बांबु आणि जाळी लावुन बंद केला आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. १९ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, १५ ते २० मिनीटात त्या, त्यांचा भाऊ आणि मुलगी असे घटनास्थळी आले व त्यांनी तुमच्याकडे विचारणा केली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. २० अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, शाकीर मुस्ताफा यांची मुलगी इशरत हिने त्यांना फोनवर सांगितले होते की, तुम्ही तिची गचांडी धरली, तिला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले, तिचा बुरखा फाडला, गळयातील चैन तुटली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. २१ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांचे साक्षीत असे आले आहे की, त्यांनी तुम्हाला समजावुन सांगितले असता तुम्ही त्यांना शिवीगाळ करुन धक्काबुक्की केली, त्यामुळे त्यांनी पोलीस स्टेशनला तक्रार दिली, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. २२ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ नाजिया अमिन शेख यांचे साक्षीत असे आले आहे की, फिरोजा ही तिची आई आहे, आसिफ हे मामा आहे, इशरत नब्बु खान यांना ती ओळखते त्यांचे वडिल तिचे आईचे भाडेकरी आहेत, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. २३ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, ती तुम्हाला ओळखते, तुम्ही त्यांचे शेजारी आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. २४ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, दि. १०/१०/२०२१ रोजी दुपारी ३.१५ वा. ती, तिची आई आणि तिचे मामा असे आईच्या घरी गप्पा मारत बसले असताना इशरत नबु खान यांचा

तिच्या आईला फोन आला, तिने फोनवर सांगितले की, घराचा रस्ता जाळी आणि बांबु लावुन तुम्ही आणि जाकीर खान यांनी बंद केलेला आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. २५ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, इशरतने तुम्हाला रस्ता बंद केल्याचे कारण विचारले असता तुमच्यामध्ये वाद झाले, तुम्ही तिचे आईला मारहाण केली, तिचा बुरखा फाडला, चैन तुटली आणि जिवे मारण्याची धमकी दिली, तसेच आम्ही तुला इथे राहु देणार नाही असे सांगितले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. २६ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यानंतर ते घटनास्थळी गेले, त्यानंतर पोलिसांनी तिचा जबाब नोंदविला, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. २७ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तुम्हाला तिने न्यायालयात आरोपी म्हणुन ओळखले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. २८ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ जाहिद कादीर खान यांच्या साक्षीत असे आले आहे की, दि. ११/१०/२०२१ रोजी केरुळकर साहेबांनी त्यांना मंगलगेट पोलीस चौकी येथे पंचनामा करण्यासाठी बोलाविले होते, घटनास्थळ हे कोठला घासगल्ली येथे होते, घटनास्थळ इशरत खान हिने दाखविले होते, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. २९ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, पंचनाम्यासाठी त्यांचेसोबत दुसरा पंच शाहरुक शाकीर खान आणि पोलीस होते, पोलिसांनी त्यांचे समोर पंचनामा (नि.२५) केला, घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर व नकाशा बरोबर आहे, त्यावर त्यांची सही आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ३० अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, घटनास्थळ पंचनामा सकाळी १०.०० वा. सुरु होऊन १०.४५ वा. संपला, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ३१ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, घटनास्थळाच्या पूर्वेस जिल्लो याचे घर, पश्चिमेस मुमताज यांचे घर, उत्तरेस मोहम्मद यांचे घर व दक्षिणेस बोळ आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे

प्र.क्र. ३२ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ फरिदा करिम खान यांच्या साक्षीत असे आले आहे की, दि. १२/१०/२०२१ रोजी त्याला पो हे कॉ संदिप यांनी मंगलगेट पोलीस चौकी येथे पंचनामा तयार करण्यासाठी बोलाविले होते, त्यांचे सोबत शाहरुख खान होते, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ३३ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, ते चौकीत गेले असता तेथे अगोदरच दोन स्त्रीया हजर होत्या, त्यापैकी एकीचे नाव इशरत खान होते, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे-

प्र.क्र. ३४ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, इशरत खान चे हातामध्ये एक पिशवी होती. त्यामधुन तिने एक बुरखा काढला, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ३५ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तिने पोलिस संदिप याचे हातात पिशवी दिली व संदिप यांनी पिशवीतुन बुरखा काढला, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ३६ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यांना बुरखा पंचनामा करण्यासाठी दाखविला व तो तिचे समक्ष जप्त केला, तो बुरखा ब्राऊन कलरचा होता त्यावर पांढ-या रंगाचे गोल आकाराचे फुल होते व तो मागच्या बाजुने फाटलेला होता, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ३७ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, तिचे समक्ष बुरखा हिरव्या पाकिटामध्ये ठेऊन सिल केला, त्यावर तिची व दुस-या पंचाची सही आहे, पंचनामा करण्यासाठी दाखविला व तो तिचे समक्ष जप्त केला, जप्ती पंचनाम्यातील मजकुर खरा व बरोबर आहे, जप्ती पंचनामा (नि.२७) वर आहे, न्यायालया समक्ष तिने सदर बुरखा ओळखला, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ३८ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ संदिप पांडुरंग केरुळकर यांच्या साक्षीत असे आले आहे की, दि. १०/१०/२०२१ रोजी तोफखाना पोलीस स्टेशन येथे पोहेकॉ या पदावर कार्यरत होते, त्यादिवशी गु र नं ८९९/२०२१ भा.द.

वि. कलम ३५४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे तपास त्यांचेकडे लेखी आदेश (नि.२९) प्रमाणे देण्यात आला, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ३९ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, आदेशासोबत त्यांना फिर्याद, छापील फिर्याद, दैनिक अहवाल देण्यात आला. याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ४० अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, घटनास्थळावर जाऊन दोन पंचा समक्ष घटनास्थळ पंचनामा (नि.२५) केला, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ४१ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यानंतर पिडीत महिलेचा कलम १६४ प्रमाणे बयाण नोंदविण्यासाठी पत्र (नि.३०) दिले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ४२ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, फिर्यादीचा बुरख जप्त करुन त्याचा जप्ती पंचनामा (नि.२७) केला आणि मुद्देमाल पावती पाडुन मुद्देमाल कार्यालयात जमा केला, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ४३ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ४४ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यानंतर फिर्यादीकडुन राहते घराचा नळ कनेक्शनचा उतारा मिळविला, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ४५ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ यांच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, आरोपी क्र.१ व २ यांनी भा. द. वि. कलम ३५४, ३४१, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा केला असे त्याचे तपासात निष्पन्न झाल्याने तुमच्याविरूद्ध दोषारोपपत्र दाखल केले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर. खोटे आहे.

प्र.क्र. ४६ अभियोग पक्षाचे साक्षीदार तुमच्या विरुध्द साक्ष का देतात?

उत्तर. आरोपी यांनी RCC 1472/2021 केस फिर्यादी यांच्या विरुध्द दाखल केल्यामुळे खोटी साक्ष देत आहे.

प्र.क्र. ४७ तुम्हाला शपथेवर जबाब द्यावयाचा आहे का?

उत्तर. नाही.

प्र.क्र. ४८ तुम्हाला बचावाचे साक्षीदार तपासावयाचे आहेत काय?

उत्तर. नाही.

प्र.क्र. ४९ तुम्हाला या केसबाबत आणखी काही जादा सांगावयाचे आहे काय?

उत्तर. या केसमध्ये फिर्यादी RCC 1472/2021 मधील सर्व आरोपी एकमेकांचे नातेवाईक असल्यामुळे आरोपी क्र. १ याने वर नमूद केसमधील सर्व आरोपी दारुधंदा बंद करण्याचे वारंवार तक्रार व निवेदन दिल्यामुळे तसेच RCC 1472/2021 केस दाखल केल्यामुळे फिर्यादी याने आरोपी विरुद्ध खोटी केस केली आहे.

अ

आरोपीची सही / अंगठा

(एल. एस. पाढेण)

मुख्य न्यायदंडाधिकारी, अहमदनगर.

दिनांक : ०७/०४/२०२६

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, आरोपीचा जबाब माझ्या समक्ष नोंदविला असून त्यातील मजकूर हा आरोपीने कथन केल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे.

(एल. एस. पाढेण)

दिनांक : ०७/०४/२०२६

मुख्य न्यायदंडाधिकारी, अहमदनगर.